## चित्रपट - संत सखू

'संत सखू' हाही प्रभातच्या संतपटांच्या पठडीतील आणखी एक चित्रपट. भक्तीरसातील गीते हे त्या चित्राचेही वैशिष्ठ्य ठरले. या चित्रपटापासून गाण्यांना उसना आवाज देण्यात येऊ लागला.

संत सखूचे काम करणाऱ्या हंसा वाडकर यांच्यासाठी विनोदिनी देसाई यांचा आवाज वापरण्यात आला.

## चित्रपट - संत सखू

### पांडुरंग भेटी वैष्णव निघाले

पांडुरंग भेटी वैष्णव निघाले
विठ्ठल विठ्ठल घोषे अंबर कोंदले.

उभा विटेवरी आम्हा विठ्ठल हाकारी
पंढरीसी जाऊ, जाऊ चंद्रभागे तीरी
पंढरीसी जाऊ, जाऊ विठूच्या नगरी.

**सखू:**

जाऊ कशी, पाहू केवी रुपडे सावळे
जिऊ उताविळ माझा शिणुले डोळुले.

ठायी ठायी वाटे काटे, अंधकार दाटे
नुरे आस कासावीस, लेकरू धाकुटे.

दावी दावी चरण माये, निववी लोचन
महासुख लाहीन मी, श्रीमुख पाहीन.

## चित्रपट - संत सखू

### भाव भुकेला हरी, करीतसे भक्तांची चाकरी

भाव भुकेला हरी, करीतसे भक्तांची चाकरी

भेटी आला भक्त सुदामा, भुलला त्याच्या भक्तीप्रेमा
दैन्य त्याचे हरी, करीतसे भक्तांची चाकरी.

त्रैलोक्याचा धनी श्रीपती, सुखे होऊनी पार्थसारथी
श्रमे पाण्डवाघरी, करीतसे भक्तांची चाकरी.

भक्त कबीरा कृष्ण कृपाळू, विणू लागतो शेले शालू
बैसुनी मागावरी, करीतसे भक्तांची चाकरी.

अंगण झाडी, जाते ओढी, संत जनीच्या घरी
कावडी रांजणात हा भरी, करीतसे भक्तांची चाकरी.

## चित्रपट - संत सखू

### शुभ बोल मुखे बोलावे

शुभ बोल मुखे बोलावे

इतरां न कधी सांगणे, जरि घरात काही उणे
हासुनी सदा सोसावे, शुभ बोल मुखे बोलावे.

श्री विठ्ठल विठ्ठल गावे.

दुमदुमे घोष श्रीहरी, सुख दु:ख भेद हो दूरी
विठ्ठलमय विश्व पहावे, श्री विठ्ठल विठ्ठल गावे.